**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**<u>आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक स्पर्धा) आयोजनाबाबत महाविद्यालयांना सूचना</u>**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने यावर्षी आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव आयोजनासाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांना पत्र पाठवून कळविण्यात आले आहे. शैक्षणिक सत्र २०१८-१९ आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवेश अर्ज, नोंदणी शुल्क रु. ५००/- व प्रवेश शुल्क पाठविण्याबाबत, याशिवाय सत्र २०१८-१९ करीता आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव (सांस्कृतिक स्पर्धा) आयोजनासाठी प्रस्ताव महाविद्यालयांकडून मागविण्यात आल्याचे पत्राद्वारे सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे. आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव २०१८ स्पर्धेची माहितीपुस्तिका, नियम व विनियमावली सुद्धा महाविद्यालयांना पाठविण्यात आली आहे. युवा महोत्सवामध्ये सहभागी कलावतांचे ओळखपत्र, सर्व प्रपत्र आणि त्यासंबंधी करावयाची कार्यवाही, महाविद्यालयांच्या संघ व्यवस्थापकाने करावयाची कार्यवाही, याबाबत सविस्तर माहिती महाविद्यालयांना विद्यार्थी विकास विभागाद्वारे पाठविण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, ज्यांना युवा महोत्सवामध्ये सहभागी व्हावयाचे आहे, त्यांनी आपल्या प्राचार्यांशी तातडीने संपर्क साधावा. याशिवाय प्राचार्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती द्यावी, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ.आर.डी. सरोदे यांनी केले आहे. या संदर्भात अधिक माहितीकरीता विद्यार्थी किंवा प्राचार्यांना डॉ.आर.डी. सरोदे यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९५०३४५७५४६ यावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १८/०७/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी